माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२२०४४९/२२/अ.क्र.४१९५-आ/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.२२०४५१/२२/अ.क्र.४१९५-ई/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.२२०४५३/२२/अ.क्र.४१९५-ऊ/२५/०१**

**श्री. एस. एम. सेलवन**
९५/५ डॉ. राजेंद्र प्रसाद चाळ,
९० फ्रीटरोड, धारावी पोलीस स्टेशन समोर,
धारावी, मुंबई-४०००१४

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी**
बृहन्मुंबई महानगरपालिका-शिक्षण विभाग, उपशिक्षणधिकारी (खाप्राशा)
कार्यालय, त्रिवेणी संगम म.न.पा. शालेय इमारत, ४था मजला,
महादेव पालव मार्ग, करिरोड(पू.) मुंबई – ४०००१२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक (शाळा)**
बृहन्मुंबई महानगरपालिका-शिक्षण विभाग, उपशिक्षणधिकारी (खाप्राशा)
कार्यालय, त्रिवेणी संगम म.न.पा. शालेय इमारत, ४था मजला,
महादेव पालव मार्ग, करिरोड(पू.) मुंबई – ४०००१२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०७.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.०६.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री. विश्वास रोकडे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक (शाळा), श्रीम. निशा यादव उपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. एल. एम. सेलवन यांनी दाखल केलेल्या अपील क्र.४१९५ आ, ऊ, ई यात तत्कालीन मा.शालेय शिक्षण मंत्री यांना अग्रेषित केलेल्या पत्रावर करण्यात आलेली कार्यवाही तसेच अनुदानीत शिक्षण बचाव समिती, मुंबई यांनी शिक्षणाचा कायदा (RTE २००९) यातील कलम १२(१)(b) याची अंमलबजावणी करण्याबाबत पाठवलेल्या पत्रावर करण्यात आलेली कार्यवाही मागितली असून अपिलार्थी यांनी त्यांच्या निवेदनासोबत तब्बल १४० विद्यार्थ्यांची यादी देखील सलग्नित केली असून

यातील तब्बल १२५ विद्यार्थ्यांची कुठेच प्रवेश झाले नसल्याचे नमूद करीत संबंधित विद्यार्थ्यांची त्यांच्या निकटच्या व दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये प्रवेश व्हावा, अशी मागणी केलीली आहे. यावर अपिलार्थी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने RTE अंतर्गत २५ टक्के अंतर्गत प्रवेश प्रणालीमध्ये भरलेल्या अर्जाची सोडत काढण्यात येते व त्यात प्रत्येक बालकांच्या पालकांना अर्ज क्रमांकचा वापर करून प्रवेश प्रक्रियेचा तपशील हा संकेतस्थळावर पाहता येतो. यात मानवी हस्तक्षेप वाव नाही, असे नमूद करीत, शाळांमध्ये २५ टक्के प्रवेशांची मर्यादा लक्षात घेता सोडतीमध्ये बालकांच्या प्रवेशासाठी हव्या असलेल्या शाळेची निवड होईलच असे नाही. मात्र अशा बालकांच्या पालकांना आवश्यक वाटल्यास प्रवेशासाठी नजीकच्या महानगरपालिका शाळांमध्य प्रवेश घेता येईल व त्यासाठी संबंधित शाळेंच्या मुख्याध्यापकाशी संपर्क साधण्याचा सल्लाही देण्यात आला होता. यातील प्रथम अपील अर्जात या आधीच उपरोक्त पत्राची प्रत ही विनामूल्य देण्याची निर्देश जारी झाली असून, अपिलार्थी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दा हा धोरणात्मक बाबींशी संबंधित असून त्यावर कुठलेही निर्देश देणे ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ यातील कार्यक्षेत्राच्या बाहेर असून अपिलार्थी यांनी १४० विद्यार्थ्यांची यादी उपरोक्त माहिती अधिकार अर्जा सोबत संलग्न केलेली आहे, त्यांना सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश देण्यासंदर्भातील असून उपरोक्त द्वितीय अपीलाशी संबंधित आज दि.२४.०७.२०२५ साली होत असून यात केलेले मागणी ही कालबाह्य (infructuous) झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत सर्व द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहेत.

**आदेश**

**वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०७.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra